स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


**परिपत्रक क्र.कोविमं/१० व १२वी/खाजगी विद्यार्थी नावनोंदणी/ऑनलाईन मुदतवाढ/फेब्रुवारी-मार्च२०२४/** 1780

**विषय : फेब्रु./मार्च २०२४ च्या इ.१०वी व इ.१२ वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने विलंब व अतिविलंब शुल्काने स्विकारणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरून नियमित शुल्काने स्विकारण्याचा कालावधी दिनांक:-३०.०९.२०२३ पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, जे विद्यार्थी उपरोक्त मुदतीत नावनोंदणी करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने विलंब व अतिविलंब शुल्काने सादर करावयाची सुविधा राज्य मंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**विलंब व अतिविलंब शुल्कासह निर्धारीत मुदत**

| विलंब शुल्क | | अतिविलंब शुल्क |
|---|---|---|
| (इ.१०वी) | (इ.१२वी) | (इ.१२वी व इ.१०वी) |
| प्रति विद्यार्थी रु.१००/- स्विकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा | प्रति विद्यार्थी रु.२५/- स्विकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा | प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.२०/- स्विकारुन नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा |
| मंगळवार दि.०३/१०/२०२३ ते रविवार दि.१५/१०/२०२३ | मंगळवार दि.०३/१०/२०२३ ते रविवार दि.१५/१०/२०२३ | सोमवार दि.१६/१०/२०२३ ते मंगळवार दि.३१/१०/२०२३ |

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१०वी व इ.१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजी मधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ** / Website इ.१०वी **http://form17.mh-ssc.ac.in**

इ.१२वी **http://form17.mh-hsc.ac.in**

३) विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता

**इ.१२वी साठी १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) इ.१०वी उत्तीर्णचे मूळ गुणपत्रक, ४) इ.१०वी उत्तीर्णचे मूळ प्रमाणपत्र ५) इ.१०वी उत्तीर्ण झालेनंतरचा गॅप जर दोन वर्षापेक्षा जास्त असेल तर त्याचे प्रतिज्ञापत्र ६) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो आणि**

**इ.१०वी साठी १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो** इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (Compulsory) आहे.

४) संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

५) विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मुळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये/संपर्क शाळेमध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

६) खाजगी विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे :-

इ.१०वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee) + विलंब शुल्क/अतिविलंब शुल्क

इ.१२वी - रू.५००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee) + विलंब शुल्क/अतिविलंब शुल्क

(विलंब व अतिविलंब शुल्क उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे शुल्क भरण्यात यावे.)

७) अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या खाजगी विद्यार्थ्यांची नाव नोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी विद्यार्थ्याची पूर्वीची शाळा किंवा पत्यानुसार सर्वात जवळची माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, श्रेणी विषयासंदर्भाती कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.याबाबत सर्व माध्यमिक शाळांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे. या वर्षापासून संपर्क केंद्र पध्दत बंद करण्यात आली असल्याने मान्यताप्राप्त सर्व शाळामधून खाजगी विद्यार्थी अर्ज स्विकारणे अनिवार्य आहे. याची सर्व मान्यताप्राप्त शाळांनी नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. त्या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे.

८) इ.१०वी व इ.१२वी फेब्रुवारी-मार्च २०२४ खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking) व्दारे भरणे अनिवार्य राहिल. ऑनलाईन पध्दताने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत:जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाना देण्यात याव्यात. तसेच एकदा नाव नोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नाव नोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम, शाखा, संपर्क केंद्र अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुनश्च: नाव नोंदणी शुल्क जमा करावे लागेल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

९) दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ /कनिष्ठ महाविद्यालय /संपर्क केंद्र यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१०) ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८ व तसेच इतर बाबींसाठी ०२०-२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

११) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (EC) ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१२)पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी ( EC ) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Application Form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे. याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

१३)**खाजगी विद्यार्थी नावनोंदणी करण्याकरीता अंतिम मुदत दि.३१/१०/२०२३ असणार आहे. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घेवून उचित कार्यवाही करावी.**

स्थळ :- कोल्हापूर.
दिनांक:-०३.१०.२०२३

( डी. एस. पोवार )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रति, प्राचार्य/मुख्याध्यापक, सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा : सातारा/सांगली/कोल्हापूर.